**STD : IXth** **MARKS : 100**

**SUB : MARATHI** **IIND SEMESTER MODEL QUESTION PAPER** **TIME – 3 HOUR.**

**प्र.१ (अ) खालील दिलेल्या उताऱ्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **(०८)**

**अ) आकृती पूर्ण करा.** **(१)**

साध्या बाजारी कुलपांची वैशिष्ट्ये
→ [ ] → [ ]

आपल्या उपयोगातील सर्व किल्ल्या बंडूनाना आपल्या जानव्यात अडकवून ठेवत असल्यामुळे त्या कधी हरवत नाहीत. हरवतात त्या बहुतकरुन त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यातल्या किल्ल्या. वरील अनर्थ गुदरल्यापासून साधी बाजारी कुलपेच ते कुटुंबाच्या स्वाधीन करु लागले. ही कुलपे किल्ल्यांच्या बाबतीत काहीच विधिनिषेध बाळगत नसत. त्यांना कोणतीही किल्ली, खिळा किंवा काडी चालत असे. कधी कधी तर नुसत्या हिसक्यानेच ती उघडत असत. त्यांची अशी 'वसुधैव कुटुंबकम् ' वृत्ती पाहून शेवटी नानांच्या पदरच्या एका विश्वासू नोकरालाही चोरी करण्याची इच्छा झाली व तो हजारपाचशे डबोले घेऊन पळून गेला. तिजोरीला कोणते कुलूप लावायचे याचा बंडूनानांना फार दिवस प्रश्न पडला होता. प्रथम त्यांनी अक्षरी कुलूप लावले; पण तिजोरी अंधारात असल्यामुळे कुलपाची अक्षरे जमवताना ती नीट दिसेनातच, म्हणून त्यांनी तिजोरी महत्प्रयासाने उजेडात आणून ठेवली. पण तेव्हापासून अक्षरे जुळवताना ती जवळ उभे राहाणारासही दिसू लागली. तेव्हा ती कुलपेही कुचकामाची ठरली. यापेक्षा अक्षरशत्रू कुलपे पुष्कळ बरी, असा टोला देत देत त्यांनी त्या कुलपाच्याऐवजी दुसऱ्या कुलपाची योजना केली. हे कुलूप नुसते दाबले की लागत असे. उघडताना मात्र त्याला किल्लीची जरुर लागे. एके दिवशी बंडूनाना आम्हांकडे हर्षित मुद्रेने येऊन म्हणू लागले, "आमच्या आर्यभूमीच्या पुत्रांना कल्पकता नाही म्हणून चोहीकडे ओरड चालू आहे. पण हा आरोप निव्वळ खोटा आहे. अहो, आम्हांला संधी मिळत नाही साधी ! ती मिळती तर आम्हांमध्ये शेकडो एडिसन झाले असते." देशाभिमानाच्या या उकळीचा अर्थ विसरता बंडूनानांनी प्रथम आपली कोणत्याही प्रकारे स्तुती करणार नाही असे आम्हांपासून वचन घेतले. नंतर लोहाराच्या मदतीने त्यांनी स्वतः तयार केलेले एक कुलूप दाखवले. ते म्हणाले, "या कुलपाची कल्पना मला आमच्या तिजोरीच्या कुलपावरुन सुचली. या कुलपाचे गुणधर्म त्या कुलपाच्या अगदी विरुध्द आहेत. त्या कुलपास उघडण्याला किल्ली पाहिजे - याला लावताना मात्र पाहिजे ते कुलूप नुसते दाबून लावता येते - माझे नुसत्या हिसड्यासारखे उघडते. हे कुलूप मी - आता तिजोरीला लावून पूर्वीचे काढून टाकणार."

हा अकल्पित प्रकार ऐकून आम्ही नानांचे मन वळवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण ज्याचे नाव ते ! नानांच्या अंगी दृढनिश्चय हा एक अलौकिक गुण आहे.'आपल्या लोकांत कोणत्याही कलेला उत्तेजन नाही' अशी पुटपुट करत त्यांनी ठरलेला बेत लागलीच अमलात आणला. थोड्याच दिवसांत आमच्या अनुमानाप्रमाणे तिजोरीची चोरी झाली, तेव्हा तर नानांचा तिळपापड झाला! ते म्हणाले, "आमच्याकडे चोरसुध्दा देशबुडचे व कलेचा आश्रय न देणारे असतात !"

**ब) आकृती पूर्ण करा.** **(१)**

अक्षरी कुलपाच्या बाबतीत आलेल्या अडचणी

| तिजोरी अंधारात ठेवल्यामुळे | तिजोरी उजेडात ठेवल्यामुळे |
|---|---|
| (१) | (२) |

**क) पुढील चौकटीत दिलेल्या संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करा :** **(२)**

| संकल्पना | संकल्पनांचा अर्थ |
|---|---|
| (१) वसुधैव कुटुंबकम् वृत्ती | |
| (२) अक्षरशत्रू कुलूप | |
| (३) चोर कलेला आश्रय देत नाही | |

**ड) पुढील शब्दांच्या विरुध्द अर्थाचे शब्द शोधून लिहा.** (१)

(१) अंधारात (२) सापडतात

**इ) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे प्रत्यय व विभक्ती ओळखा :** (१)

तिजोरी <u>अंधारात</u> असल्यामुळे <u>कुलपाची</u> अक्षरे दिसेनात.

**ई) छंदाचे महत्व या विषयावर तुमचे मत लिहा.** (२)

**प्र.१ (ब) खालील दिलेल्या उताऱ्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) आकृती पूर्ण करा.**

१) खिडकीलगतच्या लिंबाच्या झाडाची वैशिष्ट्ये (२)

मी राहत होतो त्या घराच्या मागं एक लिंबाचं झाड होतं. लिंब म्हणजे कडूलिंब नव्हे. आपण खातो त्या लिंबाचं झाड. खिडकीलगतच होतं ते काटेरी आणि लिंबाच्या फळांनी गच्च लगडलेलं असं. लसलशीत हिरवंगार आणि चैतन्यमय. प्रदेश सगळा उन्हाचा होता. त्या भागात एकाच एकूणच उन्हाळा जास्त आसमंत तापून जाई. आसपासची जमीन तापून करपून तपकिरी पडलेली दिसे. जी काही झाडं आसपास होती ती मलूल आणि काळपट हिरवी दिसत आणि पाणथळ तर परिसरात कुठंच नव्हती. सगळीकडं शुष्क कोरडी जमीन. घरसुध्दा तापून निघे. या सगळ्या पार्श्वभूमीवर ते झाड म्हणजे विलक्षण जीवनमय आणि जीवनदायी वाटे.

खरं तर भिंतीच्या उंचीचे झालेलं लिंबाचे झाड म्हणजे भोवतालच्या सजीवांच्या दिलाशाचं केंद्र झालं होतं, हे माझ्या लक्षात आलं. त्या झाडाखाली 'काळीभोर सावली' असे मोरीचं पाणी सगळं त्या झाडाला जाई. त्यामुळं जमिनीत नेमकी तिथंच ओल असे. त्या ओलसर जमिनीत मला काही शंख दिसू लागले. आज इथं दिसलेला शंख उद्या तिथं दिसे. रात्रीतून तो बराच सरकलेला असे. लहान - मोठे अनेक शंख मग दिसून येऊ लागले. मग लक्षात आलं, की या झाडाखाली गोगलगाईची वस्ती आहे. इतक्या मोठ्या आकाराच्या गोगलगाईची मी प्रथमच पाहत होतो आणि प्रथमच मी असंही पाहिलं, की त्या गोगलगाई शंख पाठीवर घेऊन तर चालतातच; परंतु त्या झाडांवरही चढ़तात. फांदीवर चिकट रंगानं बरबटलेल्या गोगलगाई पाहणं, त्यांचा प्रवास निरखणं हा माझा आणि लहान मुलांचा कौतुकाचा कार्यक्रम होऊन बसला होता.

लवकरच एक पारव्याची जोडी त्या गर्द हिरव्या आश्चर्यात दिलासा शोधू लागली. त्या जोडीनं काड्याकाड्यांचं एक घरटं त्या लिंबाच्या काटेरी झाडात बांधायला सुरुवात केली. खिडकीतून किंवा दारातून हळूच पाहिलं, की गुंजांच्या डोळ्यांची, लुकलुकत्या नजरेची पारवी दृष्टीस पडे. भोवतालच्या रखरखीतून त्या जोडीनं एक थंड असा आश्रय शोधून काढला होता. माझा मुलगा तिथं वारंवार जाऊन पाही म्हणून मग ते जोडपं हळूहळू दिसेनासं झालं.

२) **वैशिष्ट्ये लिहा.** गोगलगाय (१)

**ब) १) कारणे लिहा :** (१)

पारव्याची जोडी लिंबाच्या झाडावर राहते; कारण ..................................................

**क) विरुध्दार्थी शब्दांच्या जोड्या लावा :** (१)

| | | | |
|---|---|---|---|
| गच्च | ऊन | कोरडी | सजीव |
| ओली | निर्जीव | सावली | विरळ |

**ड) लिंग ओळखा :** (१)

**जसे - हिरवेगार - तसे -**

(१) निळे - ............ (२) काळे – .................

**इ) वृक्ष आणि मानवी जीवन यांच्यातील परस्परसंबंध विषयी तुमचे मत लिहा.** (२)

**प्र.१ (क) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **(०८)**

**अ) चौकटी पूर्ण करा.** **(१)**

(१) झेंड्याचा पांढरा रंग गुणांचे प्रतीक

(२) झेंड्याचा केशरी रंग गुणांचे प्रतीक

आपल्या झेंड्याचा मधला भाग पांढरा आहे. त्याचा अर्थ काय ? पांढरा रंग प्रकाशाचा, सत्याचा व साधेपणाचा निदर्शक आहे आणि त्यावरील अशोकचक्र काय सांगते ? ते सद्‌गुणांची, धर्माची खूण सांगते. या झेंड्याखाली काम करताना आपण धर्ममय राहू, सत्यमय राहू असा त्याचा अर्थ आहे. आपल्या वर्तनाची ही सूत्रे राहू देत. या चक्राचा आणखी काय अर्थ आहे ? चक्र म्हणजे गती. हे चक्र सांगते, की गतिमान राहा. केशरी रंग त्यागाचा व नम्रतेचा निदर्शक आहे आणि हिरवा रंग म्हणजे हरितश्यामल भूमातेचा. या ध्वजाखाली उभे राहून सेवावृत्तीने व निरहंकारीपणाने आपण पृथ्वीवर स्वर्ग निर्मूया. तीनही रंग सांस्कृतिक मूल्यांची प्रतीके आहेत. वरचा केशरी रंग हे त्यागाचे प्रतीक आहे; मधला पांढरा रंग हा सुचिता, सत्य व साधेपणाचे प्रतीक आहे; तर खालचा हिरवा रंग हे समृध्दीचे प्रतीक आहे. मधल्या पांढऱ्या रंगाच्या मध्यभागी निळ्या रंगाचे अशोकचक्र आहे. या चक्राला चोवीस आरे आहेत. यांतून गतिमानता व अखंड सेवा यांचा संदेश दिला आहे. भारतीय तिरंगा हा प्रत्येक भारतीयाचा मानबिंदू आहे. त्याचे प्राणपणाने रक्षण करणे, हे आपले परम कर्तव्य आहे.

**२) आकृतिबंध पूर्ण करा.** **(१)**




**ब) आकृतिबंध पूर्ण करा.** **(२)**

१)




२)




**क) व्याकरण :**

**१) पुढील शब्दाच्या अक्षरांपासून चार अर्थपूर्ण शब्द तयार करा :** **(१)**

हरितश्यामल :

**२) वचन बदला :** **(१)**

(१) झेंडा - .......................... (२) चक्र - ...........................

**ड) स्वमत :** **(२)**

झेंड्यातील अर्थपूर्णता स्वभाषेत लिहा.

**प्र.२ (अ) खालील दिलेल्या कवितेनुसार प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१०)**

**(१) पुढील अर्थाच्या शब्दसमूहाला कवितेतील योग्य शब्द द्या :** **(१)**

१) पेरणीसाठी लागणारे बियाणे - ......................................

२) शेतकरी पेरणीसाठी वापरतो ते अवजार - ...........................

काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते

नंदी बैलाच्या जोळीले सदाशीव हकालते
वटी बांधून पोटाले पाराबती उनारते
वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते
झोयी काटीले टांगते त्यात तानुलं लळते
त्यात तानुलं लळते ढग बरसते
काकरात बिजवाई जसं हासरं चांदनं

धरतीच्या आंगोपांगी लाळानौसाचं गोंदनं
सरीवरी सरी येती माती न्हातीधुती होते
तिचा कस्तुरीचा वास भूल जीवाले पाळते
भूत जीवाले पाळते वाट सांजीले पाहेते
मैना वाटुली पाहेते राघू तिफन हानते
राघू तिफन हानते ढग बरसते

वला टाकती तिफन शितू वखर पाहेते
पानी भिजलं ढेकूल लोनी पायाले वाटते
काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते
डोया सपन पाहेते काटा पायात रुतते

काटा पायात रुतते लाला रगत सांडते हिर्व सपन फुलते
हिर्व सपन फुलते ढग बरसते.

**(२) पुढील ओळींतील अधोरेखित संकल्पना स्पष्ट करा :** (२)

काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते

**(३) या कवितेत आलेले वऱ्हाडी बोलीतील चार शब्द शोधा व त्यांना प्रमाणभाषेतील शब्द लिहा :** (२)

| वऱ्हाडी शब्द | प्रमाणभाषेतील शब्द |
|---|---|
| | |

**(४) चौकटी पूर्ण करा :** (१)

(१) जिवाला भूल पाडणारा - [ ]

(२) पायात काटा रुतल्यामुळे - [ ]

**(५) गटात न बसणारा शब्द लिहा :** (१)

(१) हिरवे, लाल, गुलाब, काळा, पांढरा.

**(६) शब्दसमूहाबद्दल शब्द लिहा :** (१)

(१) काम करणारा - [ ] (२) मूर्ती कोरणारा - [ ]

**(७) 'काया ढेकलात डोया हिर्व सपान पाहेते ' या ओळीतील भावार्थ स्पष्ट करा.** (२)

**प्र.२ (ब) खालील पैकी कोणत्याही एका कवितेचा खालील दिलेल्या मुद्यांच्या आधारे रसग्रहण करा.** (१०)

**१) तिफन २) उजाड उघडे माळरान**

१) कवीचे नाव (१)
२) कवीचा जन्म (१)
३) कवितेची प्रस्तावना (१)
४) कवितेतील आवडलेली ओळ व भावार्थ (२)
५) कवितेतून मिळणारा संदेश (२)
६) कवीच्या दोन रचना (१)
७) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे (२)

**प्र.३ खालील पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा.** (०६)

**अ) टिपा लिहा. (कोणतेही एक)** (२)

१) व्हेनिसच्या स्टेशन बाहेरचा परिसर २) विश्वकोशाचा उपयोग

**ब)** केशभूषेचे उद्देश सांगून त्यात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो, ते स्पष्ट करा. (२)

**क)** 'व्हेनिस हे पाण्यातले जगातले एकमेव शहर आहे,' पाठाच्या आधारे या विधानाची सत्यता पटवून द्या. (२)

**प्र.४ (अ) व्याकरण विभाग :** **(२०)**

**१) सूचनेप्रमाणे लिहा.**

१) समासाचा विग्रह करुन समासाचा प्रकार ओळखा. **(४)**

१) उंचसखल  २) एकदिड  ३) दागदागिने  ४) वृक्षलता

**२) अलंकार.** **(२)**

१) त्याचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे.

२) मिटल्या पाकळ्या जणू झोपल्या पऱ्या.

(उपमेय, उपमान, समानधर्म, साम्यवाचक शब्द ओळखा)

**३) अलंकार ओळखा.** **(२)**

१) शाळा म्हणजे जणू दुसरी माताच होय.

२) शिक्षकांसम दुसरे श्रेष्ठ दैवत नाही.

**४) योग्य विरामचिन्हे घालून पुढील वाक्य पुन्हा लिहा.** **(२)**

१) आम्ही मुलं वयानं तसंच हाडापिंडाने मोठाड

२) मास्तर म्हणाले अरे आज धूलिवंदन हे चालायच

**ब) व्याकरण विभाग :** **(१)**

**१)**

| अ.क्र. | शब्द | मूळ शब्द | शब्दजात | लिंग | वचन | विभक्ती | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सकाळी | | | | | | |
| २) | गावांतून | | | | | | |

**२)** विहिरीपासून मी परतले. **(अव्ययाचा प्रकार ओळखा.)** **(१)**

**३)** पक्ष्यांना भविष्याची चाहूल लागते. **(काळ ओळखा)** **(१)**

**४)** भारला जाणे. **(वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.)** **(१)**

**५) अचूक शब्द ओळखा.** **(१)**

१) कीर्ती, किर्ती, कीर्ति, किर्ति

**६) शब्दसमूहासाठी योग्य शब्द लिहा.** **(१)**

महिन्याला प्रकाशित होणारे पुस्तक

**७) चार अर्थपूर्ण शब्द लिहा.** **(१)**

परसदार

**८) सामासिक शब्द तयार करा.** **(१)**

विद्येचे घर - ☐

**९) समानार्थी लिहा.** **(१)**

१) भेद  २) लोणी

**प्र.५ अ) पुढील कृती सोडवा.** **(१५)**

**१) कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** **(५)**

सर्व नागरिकांना
निमंत्रण

अमरावतीकरांना सुवर्णसंधी !
'सरगम' संस्था अमरावतीद्वारे आयोजित
**'दिवाळी पहाट'**
स्थळ - वसंतराव देशपांडे हॉल
कौस्तुभ व सोनाली माडे यांच्या
सुरेल, बहारदार गायनाचा कार्यक्रम

सर्वांनी सहभागी
व्हा

तृप्त करा कानांना प्रफुल्लित करा मनाला

मंगळवार दिनांक १७ ऑक्टो.

**घरपोच तिकिटांची सोय व हॉलवर विक्री सुरु.**

पहाटे ५.३० वाजता

रसिक नागरिक या नात्याने

कार्यक्रमाची तिकिटे संपल्यामुळे हाच कार्यक्रम पुन्हा सादर करण्याची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

घरपोच तिकिटे मागितल्याप्रमाणे न मिळाल्याबाबत संबंधित व्यक्तीकडे तक्रार करा.

**२) कथा लेखन:-** (५)

मिठाईचे दुकान → गरीब उपाशी मुलगा → मिठाईचा वास घेतो / मिठाईवाला पैसे मागतो

चाणाक्ष वकील ऐकतो → खिशातली नाणी वाजवतो → मिठाईच्या वासाची किंमत / मिठाईवाला गप्प

**३) आकलन लेखन:-** (५)

**पुढील उतारा वाचून त्यांवर आधारित पाच प्रश्न असे तयार करा की, त्यांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील.**

निसर्ग महान जादूगार आहे. तो अतर्क्य असून त्याचे चमत्कार, त्याच्या लीला अगाध आहेत. निसर्ग हा प्रसन्न, रमणीय, सौंदर्यशील आहे. त्याच्या संगतीत रमताना कळत - नकळत आपण खूप गोष्टी शिकतो. आपण अंतर्मुख होतो, विचार करु लागतो. दुथडी भरुन वाहणारी नदी, उडी घेणारे जलप्रपात, वाहता झरा हे सारे आपल्याला जणू 'पुढे जा, पुढे पुढे जात राहा' असा संदेश देतात. आसमंत गंधित करणारे सुगंधी फूल, मन रिझवणारा वारा, शीतल छाया देणारा व रसाळ फळे देणारा वृक्ष, आपल्या कृपेची बरसात करणारा मेघ हे सारे आपल्याला 'देते व्हा, देण्यातला आनंद लुटा,' हा कानमंत्र देत राहतात.

**प्र.५ ब) खालील पैकी कोणतेही दोन कृती सोडवा.** (१०)

**१) जाहिरात लेखन :- पुढील जाहिरात पाहून त्याखालील कृती करा.** (५)

श्री. हनुमंत वाळके यांची व्यायामशाळा

**वाळके शक्ती जिम**

स्वत:सोबत एक व्यक्ती आणा.

**-: आमची काही खास वैशिष्ट्ये : -**

१०% सवलत मिळावी.

- वातानुकूलित प्रशस्त जागा
- सोयीस्कर वेळा
- आधुनिक यंत्रसामुग्री
- अनुभवी शिक्षक
- माफक फी

**: पत्ता :**

**निरामय सदन, शास्त्री मार्ग, जळगाव**

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य.

१) **चौकट पूर्ण करा.** (२)




२) **जाहिरातीतील काही मजकूर चुकीचा वाटतो का? सकारण नमूद करा.** (२)

३) **वरील जाहिरात अधिक आकर्षक बनवण्यासाठी तुम्ही कोणकोणते बदल सुचवाल ?** (१)

२) **संवाद लेखन :-** (५)

**विद्यार्थ्यांसाठी सूचना**

जागतिक पर्यावरणदिनानिमित्त 'आनंदनिकेतन ' या वृक्षवाटिकेतर्फे

**वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन**

इच्छुक विद्यार्थ्यांनी २५ एप्रिलपर्यंत वर्गशिक्षकांकडे आपली नावे नोंदवावीत व
५ जूनला सकाळी ७.३० ला शाळेत जमावे.

टीप : येताना उन्हाळी सुट्टीत जमवलेल्या फळबिया सोबत आणाव्यात.

**वरील सूचना वाचा आणि तुम्ही व तुमचा मित्र यांच्यातील संवाद लिहा.**

३) **वृत्तांत लेखन :-** (५)

**नवमहाराष्ट्र विद्यालय**

विमाननगर, वसई

**जागतिक विज्ञानदिन सोहळा**

जागतिक विज्ञानदिनानिमित्त सुप्रसिध्द खगोल शास्त्रज्ञ
डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान

प्रमुख उपस्थिती -

२८ फेब्रुवारी २०१८
**वेळ**
सकाळी ११ वाजता

**स्थळ :**
डॉ. होमी भाभा सभागृह

**प्र.५ क) निबंध लेखन :- (कोणतेही एक)** (०५)

१) शेतकऱ्याचे आत्मवृत्त  २) माझा आवडता छंद  ३) मला पंख असते तर !

*** BEST OF LUCK ***

**STD : IXth** **MARKS : 100**

**SUB : MARATHI** **IIND SEMESTER MODEL PAPER SOLUTION** **TIME – 3 HOUR**

**प्र.१ (अ) खालील दिलेल्या उताऱ्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) आकृती पूर्ण करा.** (१)

**उत्तर:**

साध्या बाजारी कुलपांची वैशिष्ट्ये
- **कोणतीही किल्ली, खिळा किंवा काडी ती उघडायला पुरेशी होते.**
- **नुसत्या हिसक्यांनी ती उघडत.**

**ब) आकृती पूर्ण करा.** (१)

**उत्तर :**

अक्षरी कुलपाच्या बाबतीत आलेल्या अडचणी
- तिजोरी अंधारात ठेवल्यामुळे – **(१) कुलपाची अक्षरे जमवताना ती दिसत नव्हती.**
- तिजोरी उजेडात ठेवल्यामुळे – **(२) अक्षरे जुळवताना जवळ उभे राहण्याला दिसत.**

**क) पुढील चौकटीत दिलेल्या संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करा :** (२)

**उत्तर :**

| **संकल्पना** | **संकल्पनांचा अर्थ** |
|---|---|
| (१) वसुधैव कुटुंबकम् वृत्ती | **सारे विश्व माझे कुटुंब आहे अशी वृत्ती.** |
| (२) अक्षरशत्रू कुलूप | **ज्यावर अक्षरे नाहीत असे कुलूप.** |
| (३) चोर कलेला आश्रय देत नाही | **वेगवेगळ्या तऱ्हेच्या कला असलेल्या कुलपांना मान न देता चोरी करतात.** |

**ड) पुढील शब्दांच्या विरुध्द अर्थाचे शब्द शोधून लिहा.** (१)

**उत्तर :** (१) अंधारात × **उजेडात** (२) सापडतात × **हरवतात.**

**इ) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे प्रत्यय व विभक्ती ओळखा :** (१)

**उत्तर :** <u>अंधारात</u> - त - सप्तमी.
<u>कुलपाची</u> - ची - षष्ठी.

**ई)** प्रत्येक माणसाला काही तरी छंद असतोच. उलट प्रत्येक जण छंदातून जगत असतो. आजच्या शहरातल्या धावपळीत ताणतनावात प्रत्येक जण जगत असतो. यातून क्षणभर विरंगुळासाठी त्याला आपले मन छंदात गुंतवून ठेवले पाहिजे. सुखदु:खाच्या चक्रातून सुखरुपपणे निसटण्यासाठी छंद आवश्यक आहे. कारण छंद त्याच्या मनाला उत्साही आनंदीत करतो. (२)

**प्र.१ (ब) खालील दिलेल्या उताऱ्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) आकृती पूर्ण करा.**

**उत्तर : १)** (२)

खिडकीलगतच्या लिंबाच्या झाडाची वैशिष्ट्ये
- **काटेरी**
- **लसलशीत हिरवेगार**
- **लिंबाच्या फळांनी गच्च लगडलेले**
- **चैतन्यमय**

**उत्तर : २) वैशिष्ट्ये लिहा.** गोगलगाय → **शंख पाठीवर घेऊन चालतात** / **झाडांवरही चढतात** (१)

**ब) १) कारणे लिहा :** (१)

**उत्तर :** पारव्याची जोडी लिंबाच्या झाडावर राहते; कारण **लिंबाच्या गर्द हिरव्या आश्चर्यात त्यांनी दिलासा शोधला.**

**क) विरुध्दार्थी शब्दांच्या जोड्या लावा :** (१)

**उत्तर :** १) गच्च × विरळ     २) कोरडी × ओली

३) ऊन × सावली     ४) सजीव × निर्जीव

**ड) लिंग ओळखा :** (१)

**जसे - हिरवेगार - तसे -**

**उत्तर :** (१) निळे - **निळेशार**     (२) काळे – **काळेभोर**

**उत्तर : इ)** वृक्ष आणि मानवी जीवन यांचा घनिष्ठ संबंध आहे. घनदाट वृक्षांच्या राईमुळे पाऊस येतो. पावसाच्या पाण्यावर सर्व प्राण्यांचे जीवन अवलंबून आहे. वृक्षाचा प्रत्येक अवयव मानवासाठी उपयुक्त आहे. झाडे, पाने, फुले, फळे देतात. घनदाट छाया देतात. वृक्षांपासून घरबांधणीसाठी लाकूड मिळते. झाडांपासून कागद तयार होतो. फळझाडे व फुलझाडे यांपासून परिसराला शोभा येते. काही वृक्ष औषधी असतात. ते माणसांचे आरोग्य तंदुरुस्त ठेवतात. हरप्रकारे वृक्ष माणसाला मदत करणारे आहेत. त्यामुळे वृक्ष हा माणसाचा खराखुरा मित्र आहे. (२)

**प्र.१ (क) खालील दिलेल्या उताऱ्यावरुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) चौकटी पूर्ण करा.** (१)

(१) झेंड्याचा पांढरा रंग गुणांचे प्रतीक - **प्रकाशाचा, सत्याचा व साधेपणाचा निदर्शक आहे.**

(२) झेंड्याचा केशरी रंग गुणांचे प्रतीक - **त्यागाचा व नम्रतेचा निदर्शक आहे.**

**२) आकृतिबंध पूर्ण करा.** (१)

वर्तमानाची सूत्रे → **धर्ममय राहू** / **सत्यमय राहू**

**ब) आकृतिबंध पूर्ण करा.** (२)

१) अशोकचक्राची वैशिष्ट्ये → **गतिमानता** / धर्माची खूण / **अखंड**

२) या कृतीने पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करायचा → **सेवावृत्त** व **निरहंकारी**

**क) व्याकरण :**

**१) पुढील शब्दाच्या अक्षरांपासून चार अर्थपूर्ण शब्द तयार करा :** (१)

**उत्तर :** हरितश्यामल : **१) हरि  २) श्यामल  ३) मल  ४) मत**

**२) वचन बदला :** (१)

**उत्तर :** (१) झेंडा – **झेंडे** (२) चक्र - **चक्र**

**ड) स्वमत :** (२)

**उत्तर :** आपल्या भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा आहे. झेंड्यांच्या वरच्या भागावर असलेला केसरी रंग हा त्यागाचे व नम्रतेचे प्रतीक आहे. देशासाठी ज्या ज्या देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्या सर्वांच्या त्यागाचे प्रतीक म्हणजे केसरी रंग. झेंड्याचा पांढरा रंग प्रकाशाचा सत्याचा व साधेपणाचा निदर्शक आहे. तो पांढरा रंग हा शांततेचे प्रतीक आहे. झेंड्याच्या खालच्या भागात असणारा हिरवा रंग हा हरितश्यामल भूमातेचा आहे. हिरवा रंग समृध्दीचे प्रतीक म्हणूनही ओळखला जातो. झेंड्यावर असलेले अशोकचक्र हे सद्गुणांची धर्माची खूण आहे. या झेंड्याखाली काम करताना आपण धर्ममय व सत्यमय राहू अस त्याचा अर्थ आहे.

**प्र.२ (अ) खालील दिलेल्या कवितेनुसार प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१०)**

**(१) पुढील अर्थाच्या शब्दसमूहाला कवितेतील योग्य शब्द द्या :** **(१)**

**उत्तर : १)** पेरणीसाठी लागणारे बियाणे - **बिजवाई**

२) शेतकरी पेरणीसाठी वापरतो ते अवजार - **तिफन**

**(२) पुढील ओळींतील अधोरेखित संकल्पना स्पष्ट करा :** **(२)**

**उत्तर :** पावसात नांगरुन झालेल्या जमिनीत बी पेरले की भविष्यात हिरवे तरारलेले पीक उगवेल अशी शेतकऱ्याच्या मनात आशा निर्माण होते. काळ्या ढेकळातून उगवलेल्या हिरव्या कोंभाचे तो प्रत्यक्ष डोळ्यांनी स्वप्न पाहतो आहे.

**(३) या कवितेत आलेले वऱ्हाडी बोलीतील चार शब्द शोधा व त्यांना प्रमाणभाषेतील शब्द लिहा :** **(२)**

**उत्तर :**

| वऱ्हाडी शब्द | प्रमाणभाषेतील शब्द |
|---|---|
| काया | काळ्या |
| जोळीले | जोडीला |
| झोयी | झोळी |
| लळते | रडते |

**(४) चौकटी पूर्ण करा :** **(१)**

**उत्तर :** (१) जिवाला भूल पाडणारा - **कस्तुरीचा वास**

(२) पायात काटा रुतल्यामुळे - **लाल रक्त सांडते.**

**(५) गटात न बसणारा शब्द लिहा :** **(१)**

**उत्तर :** (१) **गुलाब**

**(६) शब्दसमूहाबद्दल शब्द लिहा :** **(१)**

**उत्तर :** (१) काम करणारा - **कामकरी** (२) मूर्ती कोरणारा - **मूर्तिकार**

**उत्तर : (७)** शेतकरी शेत नांगरतो. नांगरलेल्या शेतात बियाणे पेरतो. पाऊस आला की त्याला आनंद होतो. त्याच्या डोळ्यांसमोर भविष्यात शेतात डोलणारे हिरवे पीक उभे राहते. तो जणू हिरवे स्वप्न पाहत असतो; कारण या शेतात उगवणाऱ्या धनधान्यातून त्याचे जीवन सुरक्षित होणार असते. उद्या त्याच्या कष्टाचे चीज होईल म्हणून तो शेतात राबत असतो. त्याच्या मनातील भावना या ओळींमध्ये व्यक्त झाल्या आहेत, की पावसात भिजणाऱ्या काळ्या ढेकळांमध्ये त्याच्या डोळ्यांना हिरवे स्वप्न दिसू लागते. **(२)**

**प्र.२ (ब) खालील पैकी कोणत्याही एका कवितेचा खालील दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे रसग्रहण करा.** **(१०)**

**उत्तर : (१) तिफन**

१) **कवीचे नाव** - श्री. विठ्ठल वाघ **(१)**

२) **कवीचा जन्म** - १९४५ **(१)**

३) **कवितेची प्रस्तावना** - कवी विठ्ठल वाघ यांचे 'काळ्या मातीत मातीत,' 'पंढरीच्या वाटेवर', 'कपाशीची चंद्रफुले', 'पाऊसपाणी' हे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. ग्रामीण जीवनातील वास्तव वर्णन करणे, हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. **(१)**

४) **कवितेतील आवडलेली ओळ व भावार्थ** - 'झोयी काटीले टांगते त्यात तानुलं लळते

त्यात तानुलं लळते ढग बरसते.' **(२)**

५) **कवितेतून मिळणारा संदेश** - साऱ्या जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी , त्याचे कष्टमय जीवन जाणून घ्यावे व ग्रामीण जीवनाचा व बोलीचा परिचय व्हावा, हा उद्देश समाजमनाला कळणे, फार महत्वाचे आहे. **(२)**

६) **कवीच्या दोन रचना** - पंढरीच्या वाटेवर, अंधारयात्रा **(१)**

७) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** - शेतकऱ्यांच्या कष्टकरी जीवनाचे चित्र हृदयाला भिडणारे आहे. भर पावसात शेतीकाम करताना तान्हे मूल रडत असतानाही पेरणी करावी लागते व हिरवे स्वप्न फुलवावे लागते, हा आशय हृदय हेलावून सोडणारा आहे. लोकगीताची एक संथ लय या कवितेला आहे. पावसात भिजलेल्या मातीला न्हातीधुती स्त्री म्हटले आहे व या काळ्याआईचे हृद्य वर्णन चपखल शब्दांत केल्यामुळे ही कविता मला खूप आवडली. **(२)**

**(२) उजाड उघडे माळरान**

१) **कवयित्रीचे नाव** - कवयित्री ललिता गादगे. **(१)**

२) **कवीचा जन्म** - १९५४ **(१)**

३) **कवितेची प्रस्तावना** - प्रस्तुत कवयित्रींनी कविता, कथा व ललितगद्य हे वाङ्मयप्रकार हाताळले आहेत. (१)

४) **कवितेतील आवडलेली ओळ व भावार्थ** - दुरंगी चुनरीत उभी ही घाणेरी ही नटुनी थटुनी.

**भावार्थ** - घाणेरीचे झुडूप दोन रंगांचा दुपट्टा ओढून नटून थटून उभे आहे. (२)

५) **कवितेतून मिळणारा संदेश** - निसर्गातील सौंदर्य टिकवणे व पर्यावरण शुध्द ठेवणे हे मानवाचे कर्तव्य आहे. (२)

६) **कवीच्या दोन रचना** - फसवी क्षितीजे, अग्नीजळ (१)

७) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** - वसंतऋतूचे मनोहारी चित्रण सुंदर शब्दकळेत साकारले आहे. निसर्गातील प्रत्येक घटक नटून थटून वसंताचे स्वागत कसे करतो, याच्या सुरेख कल्पना केल्या आहेत. प्रस्तुत कविता एक सुंदर निसर्गकविता असल्यामुळे ही कविता मला आवडली. (२)

**प्र.३ खालील पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा.** **(०६)**

**अ) टिपा लिहा. (कोणतेही एक)** **(२)**

**उत्तर : १) व्हेनिसच्या स्टेशन बाहेरचा परिसर :** व्हेनिस हे गाडीचे अखेरचे स्टेशन आहे. तेथे रेल्वेचे नोकर'ऑल आऊट' असे इंग्रजीत व त्या अर्थाचे इटालियन व फ्रेंच भाषेत ओरडत डब्यांतून फिरतात. स्टेशनच्या बाहेर रस्ता नाहीच. विस्तीर्ण नदीसारख्या ग्रँड कॅनॉल नावाचा प्रचंड कालवा आहे. त्यात अनके पॉटर टॅक्सी म्हणजे लहान मोटर लाँचीस व मोठ्या यांत्रिक बोटी उभ्या असतात. 'व्हेनिझिया - व्हेनिझिया, पियाझा - पियाझा ' असा पुकारा चाललेला असतो. लेखक टॅक्सीपेक्षा बोटीच्या बसने अडीचशे लिराचे तिकीट काढून पुढच्या प्रवासाला निघाले.

**२) विश्वकोशाचा उपयोग :** शिक्षणाचा प्रसार खूप झपाट्याने झाला. औद्योगिकीकरणामुळे समाजाच्या वैज्ञानिक व तांत्रिक गरजा वाढल्या. विविध प्रकारचे शब्द अस्तित्वात आले व भाषा समृध्द झाल्या. त्यामुळे आजच्या यंत्रयुगातील व विज्ञानयुगातील माणसाला आपले ज्ञान विश्वव्यापी व अद्ययावत करण्यासाठी विश्वकोशाची गरज निर्माण झाली. मानव्यविद्या, विज्ञान व तंत्रज्ञान यांतील सर्व संग्रहित विषयांची माहिती व ज्ञान विश्वकोशात समाविष्ट असते. मुख्य विषय व त्याच्या संलग्न विषयांचे ज्ञान मिळवण्यासाठी विश्व कोशाचा अत्यंत निकडीचा उपयोग आहे.

**उत्तर : ब)** मोकळे केस इतरांना दिसू नयेत, म्हणून पुरातन स्त्रियांनी केशबंधनाची कल्पना राबवली असावी. या कल्पनेतून केशभूषेचा उगम झाला असावा. लेण्यांमधल्या शिल्पकृतीत आढळणाऱ्या स्त्रियांनी केलेल्या प्राचीन केशरचनांचे अनुकरण भारतीय स्त्रिया करताना आढळतात. केशभूषेचा मुख्य उद्देश हा आकर्षकता व सौंदर्य वाढवणे हा आहे. सामाजिक संकेतानुसार प्रतीकात्मक केशभूषा करणे, हा केशभूषेचा सामाजिक उद्देश ठरतो. केशभूषेत केस कापणे, केस धुणे, नीट करणे, विंचरणे, कुरळे किंवा सरळ करणे या गोष्टींचा अंतर्भाव होतो. (२)

**उत्तर : क)** व्हेनिस शहर हा अनेक छोट्या बेटांचा सागरातला पुंजकाच आहे. या शहरात रस्ते नाहीत. एकही मोटार नाही. आहेत ते फक्त कालवे आणि कालवेच व त्यांना जोडणारे पूल. व्हेनिसमध्ये ग्रँड कॅनॉल नावाचा प्रचंड नदीएवढा विस्तीर्ण कालवा आहे. त्यातून लहान - मोठ्या बोटी फिरतात, प्रवाशांची ने - आण करतात. व्हेनिसमध्ये अफाट जलदर्शन होते. व्हेनिस म्हणजे केवळ कालव्यांचे शहर नव्हे, तर कालव्यांत तरंगणारे शहर आहे. अशा प्रकार व्हेनिस हे कलासक्त व निळ्या पाण्यावर तरंगणारे शहर असल्यामुळे 'पाण्यातले जगातले एकमेव शहर आहे, ' असे म्हटले जाते. (२)

**प्र.४ (अ) व्याकरण विभाग :** **(२०)**

**१) सूचनेप्रमाणे लिहा.**

**उत्तर:** १) समासाचा विग्रह करुन समासाचा प्रकार ओळखा. (४)

**१) उंचसखल** - उंच किंवा सखल - वैकल्पिक व्दंव्द समास

**२) एकदिड** - एक किंवा दिड - वैकल्पिक द्वंद्व समास

**३) दागदागिने** - दाग , दागिने इत्यादी - समाहार द्वंद्व समास

**४) वृक्षलता** - वृक्ष आणि लता - इतरेतर द्वंद्व समास

**२) अलंकार.** **(२)**

**उत्तर:** १) त्याचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे.

**उपमेय - अक्षर, उपमान - मोती, समानधर्म - सुंदर, साम्यवाचक - सारखे**

२) मिटल्या पाकळ्या जणू झोपल्या पऱ्या.

**उपमेय - पाकळ्या, उपमान - पऱ्या/ परी, समानधर्म - झोपणे, साम्यवाचक - जणू**

**३) अलंकार ओळखा.** **(२)**

**उत्तर :** १) 'शाळा' या उपमेयाची 'माता ' या उपमानाशी तुलना करताना 'जणू' हा साधर्म्यवाचक शब्द वापरला आहे; म्हणून हा **उत्प्रेक्षा अलंकार** आहे.

२) 'शिक्षक' या उपमेयाची 'दैवत' या उपमानाशी तुलना करताना 'सम' हा साधर्म्यवाचक शब्द वापरला आहे. म्हणून हा **उपमा अलंकार** आहे.

**४) योग्य विरामचिन्हे घालून पुढील वाक्य पुन्हा लिहा.** (२)

**उत्तर:** १) आम्ही मुलं वयानं तसंच हाडा-पिंडाने मोठाड.

२) मास्तर म्हणाले, "अरे ! आज धूलिवंदन ! हे चालायच !"

**ब) व्याकरण विभाग :**

**१) उत्तर:** (२)

| अ.क्र. | शब्द | मूळ शब्द | शब्दजात | लिंग | वचन | विभक्ती | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सकाळी | सकाळ | क्रियाविशेषण अव्यय | स्त्रीलिंग | एकवचन | षष्ठी | अविकारी |
| २) | गावांतून | गाव | शब्दयोगी अव्यय | नपुसकलिंग | अनेकवचन | पंचमी | अविकारी |

**२)** विहिरीपासून मी परतले. (१)

**उत्तर:** पासून - **शब्दयोगी अव्यय।**

**३)** पक्ष्यांना भविष्याची चाहूल लागते. (१)

**उत्तर: वर्तमानकाळ**

**४)** भारुन जाणे - **आकर्षित होणे.** (१)

**उत्तर:** आजच्या पिढीतला तरुण नेहमी नव्या विचाराने भारला जातो.

**५) अचूक शब्द ओळखा.** (१)

१) कीर्ती, किर्ती, कीर्ति, किर्ति

**उत्तर: किर्ती**

**६) शब्दसमूहासाठी योग्य शब्द लिहा.** (१)

महिन्याला प्रकाशित होणारे पुस्तक

**उत्तर: मासिक**

**७) चार अर्थपूर्ण शब्द लिहा.** (१)

परसदार

**उत्तर: पर, परस, दार, रस**

**८) सामासिक शब्द तयार करा.** (१)

विद्येचे घर - [ ]

**उत्तर: विद्यालय**

**९) समानार्थी लिहा.** (१)

१) भेद २) लोणी

**उत्तर: भेद - रहस्य** **२) लोणी - नवनीत**

**प्र.५ अ) पुढील कृती सोडवा.** (१५)

**१) कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** (५)

**मागणीपत्र :**

वैभव सातोस्कर,
१९३०, शनिवार पेठ,
उभ्या मारुतीजवळ,
पुणे - ४११ ०३०.
दिनांक - ५ ऑक्टोबर २०१७

प्रति,
मा. व्यवस्थापक,
सरगम संस्था,
अमरावती - ४४४ ६०१.

**विषय :** 'दिवाळी पहाट' हा कार्यक्रम १८ ऑक्टोबर रोजीसुध्दा पहाटे सादर करण्याबाबत.

महोदय,

सर्वप्रथम आपले व आपल्या संस्थेतील अन्य सहकाऱ्यांचे खूप खूप आभार मानले पाहिजेत. कौस्तुभ व सोनाली माडे हे नव्या पिढीतील दमदार गायक आहेत. त्यांच्या सुरेल व बहारदार गायनाचा कार्यक्रम आपण आयोजित केलात. आम्हां पुणेकरांसाठी ही सुवर्णमेजवानी आहे. त्यामुळे पहिल्यात दिवशी हॉलवरच सर्व तिकिटे संपली.

एरवी ही अत्यंत आनंदाची असलेली गोष्ट माझ्यासारख्या शेकडो लोकांसाठी खूप निराशेची ठरली आहे. मला असे कळले आहे की, तिकीट विक्री सुरु झाल्यानंतर दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या दिवशी शेकडो लोक हॉलवर आले होते. पण त्यांना तिकीट मिळाले नाही. मी माझ्या ऑफिसच्या कामानिमित्त बाहेरगावी गेलो होतो. तिकीट विक्रीच्या तिसऱ्या दिवशी मी आलो. मलाही तिकीट मिळाले नाही.

माझी आपल्याला कळकळीची विनंती की, आपण हाच कार्यक्रम १८ ऑक्टोबर किंवा १९ ऑक्टोबर रोजी पुण्यामध्येच सादर करावा. त्यामुळे शेकडो निराश लोक आनंदित होतील. त्वरेने निर्णय घेऊन तिकीट विक्री सुरु करावी. ही विनंती.

कळावे,

आपला नम्र
वैभव सातोस्कर

**किंवा**

**तक्रारपत्र :**

मधू कोलाबकर,
१०, पंचगंगा, ब्रम्ह्मपुरा,
अमरावती - ४४४ ६०१.
दिनांक : २३ ऑक्टोबर २०१७

प्रति,
मा. व्यवस्थापक,
सरगम संस्था,
अमरावती - ४४४ ६०१.

**विषय :** घरपोच तिकीट न मिळाल्याबद्दल.

महोदय,

मी दु:खी मनाने आपल्याकडे माझी तक्रार नोंदवत आहे. आपण कौस्तुभ व सोनाली माडे यांच्या सुरेल व बहारदार गायनाचा कार्यक्रम आयोजित केलात. त्यामुळे आम्ही खुशीत होतो. तिकीट विक्रीच्या पहिल्याच दिवशी मला हॉलवर जाणे शक्य नव्हते. म्हणून आपण दिलेल्या फोनवर घरपोच तिकिटांची मागणी नोंदवली. 'घरपोच तिकिटांची सोय ' असे आपण जाहीर केले होते. मी अगदी वेळेतच माझी मागणी नोंदवली होती. प्रत्यक्षात मात्र हॉलवरच सर्व तिकिटे विकण्यात आल्याचे कळले. हे अत्यंत अयोग्य होते. आपण याबद्दल जाहीर दिलगिरी व्यक्त केली पाहिजे, असे मी आग्रहपूर्वक सांगू इच्छितो.

कळावे,

आपला नम्र
मधू कोलाबकर

**२) कथा लेखन:-** (५)

**उत्तर :**

**जशास तसे**

एका गावात एक हलवाई राहत होता. त्याचे मिठाईचे मोठे दुकान होते. मिठाईच्या दुकानातून नेहमी ताज्या मिठाईचा घमघमाट येत असे. रस्त्याने जाणारा - येणारा माणूस मिठाईच्या वासाने क्षणभर थबकत असे.

एकदा एक गरीब मुलगा हलवायाच्या दुकानाजवळून चालला होता. मिठाई पाहून तो दुकानाजवळ थांबला. गेले दोन दिवस तो उपाशीच होता. मिठाईच्या गोड वासाने त्याच्या तोंडाला पाणी सुटले, "वा, काय गोड वास आहे या मिठाईचा !" हे त्याचे उद्गार हलवायाने ऐकले; तेव्हा तो लोभी हलवाई म्हणाला, "ए मुला, मिठाईचा वास तू घेतलास ना, त्याचे पाच रुपये दे." मुलगा घाबरला. आता काय करावे, हेच त्याला कळेनासे झाले.

केवळ मिठाईचा वास घेतल्याबद्दल एका गरीब मुलाकडून हलवाई पैसे मागतोय, हे जवळच उभ्या असलेल्या एका चाणाक्ष वकिलाने पाहिले. हलवायाला चांगलाच धडा शिकवावा असे ठरवून तो हलवायाला म्हणाला, "या गरीब मुलाने घेतलेल्या मिठाईच्या वासाची किंमत मी तुला देतो." असे म्हणून वकिलाने आपल्या खिशातील नाणी खळखळून वाजवली. "ऐकलास ना नाण्यांचा आवाज, हीच त्या मिठाईच्या वासाची किंमत. मिळाली ना! " वकिलाच्या चातुर्याने हलवाई चांगलाच शरमला. त्याला चांगलाच धडा मिळाला.

**तात्पर्य -** शेरास सव्वाशेर मिळतोच.

३) **आकलन लेखन:-** (५)

**पुढील उतारा वाचून त्यांवर आधारित पाच प्रश्न असे तयार करा की, त्यांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील.**

**उत्तर :** १) 'पुढे पुढे जात राहा ' असा संदेश कोण देतात ?

२) महान जादूगार कोणाला म्हटले आहे ?

३) निसर्गाला कोणती विशेषणे बहाल केली आहेत ?

४) फूल, वारा, वृक्ष, मेघ आपल्याला कोणता कानमंत्र देतात ?

५) 'लीला अगाध असणे ' म्हणजे काय ?

**प्र.५ ब) खालील पैकी कोणतेही दोन कृती सोडवा.** (१०)

**१) जाहिरात लेखन :-** (५)

**१) चौकट पूर्ण करा.** (२)

**उत्तर :**




**उत्तर:२)**(१)'वाळके शक्ती जिम' हे व्यायामशाळेचे नाव खूपच लहान आहे. लक्षवेधक नाही.'श्री. हनुमंत वाळके यांची व्यायामशाळा ' हे शब्द अकारण मोठे आहेत. जाहिरातीत हे शब्द नसते तरी चांगले झाले असते. (२)

(२)'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य ' या माहितीची गरज नाही. सर्व तुकड्यांच्या जागा भरत असल्यामुळे कमी जागा उपलब्ध आहेत, अशी स्थिती असती, तर या माहितीची गरज होती. तसे असेल, तर तिचा उल्लेख असायला हवा होता.

(३) महिलांच्या सोयीचा उल्लेख नाही.

(४) १०% सवलतीसंबंधातील मजकूर तोडून व चुकीच्या ठिकाणी दिला आहे.

**उत्तर :३) जाहिरात आकर्षक करण्यासाठी आणखी उपाय :** (१)

(१) व्यायामशाळेचे नाव ठळकपणे द्यावे.

(२) व्यायामपटूंची चित्रे द्यावीत.

(३) वैद्यकीय तपासणी करुन योग्य व्यायाम देण्याची सुविधा असल्याचा उल्लेख करावा.

(४) स्त्रियांसाठी असलेल्या सोयीचा उल्लेख करावा.

(५) आहारतज्ज्ञांकडून आहाराचे मार्गदर्शन मिळेल, असा उल्लेख करावा.

२) **संवाद लेखन :-** (५)

**वेदान्त** : अक्षय, आज फळ्यावत लावलेली सूचना वाचली काय रे ?

**अक्षय** : हो, वाचली ना !

**वेदान्त** : मग नाव दिलंस का ?

**अक्षय** : नाव दिलं की त्याच वेळी.

**वेदान्त** : मीपण नाव देणार आहे. खूप छान कल्पना आहे, नाही ?

**अक्षय** : कल्पना छानच आहे. मी मात्र वेगळीच योजना आखलीय या वर्षी.

**वेदान्त** : योजना ? सांग तरी.

**अक्षय** : दरवर्षी सगळीकडे वृक्षारोपण करतात. पण त्यानंतर लावलेल्या रोपट्यांकडे कोणीच लक्ष देत नाही.

**वेदान्त** : मग तू करणार आहेस तरी काय ?

**अक्षय** : आम्ही आमच्या गल्लीत काही रोपटी लावणार आहोत.

**वेदान्त** : आम्ही म्हणजे कोण ?

**अक्षय** : आम्ही म्हणजे त्या गल्लीतले माझे सगळे मित्र आणि मी. आम्ही गल्लीतली सर्व नवी - जुनी झाडे दत्तक घेणार आहोत. वर्षभर त्यांची निगाराखणी करणार आहोत.

**वेदान्त** : निगाराखणी करणार ? म्हणजे काय करणार ?

**अक्षय** : सर्व झाडांभोवती आळी करणार. झाडाभोवतालची माती उकरणार. त्या मातीत औषध घालणार. मग त्यात खत मिसळणार. आम्ही मित्रांनी वनखात्याच्या कार्यालयात जाऊन सगळी माहिती घेतली आहे. त्यांना खूप आनंद झाला. ते सर्व प्रकारचे मार्गदर्शन व मदत करणार आहेत.

**वेदान्त** : फारच छान ! मी पण येतो तुमच्याबरोबर.

**अक्षय** : त्यापेक्षा तू असं कर ना - तू तुझ्या मित्रांना इथे आण. आम्ही त्यांना सर्व समजावून सांगू आणि तुम्ही तुमच्या आवारात हा उपक्रम करा.

३) **वृत्तांत लेखन :-** (५)

**वसई, दि. १ मार्च :** हजारो वर्षापासून माणूस विश्वाचा शोध घेत आहे. नुकतेच त्याने एक मोठे पाऊल टाकले आहे. ५०० कोटी प्रकाशवर्षे अंतरावरील आकाशगंगेचा नुकताच शोध लागला आहे. आता माणसाला अंतराळातील बऱ्याच गोष्टींचा उलगडा होणार आहे. सर्वांना थक्क करुन टाकणाऱ्या या शोधाची माहिती व त्याचे होणारे फायदे यांची थरारक हकिकत डॉ. जयंत नारळीकर यांनी जागतिक विज्ञानदिन सोहळ्यानिमित्त सांगितली आणि श्रोत्यांना मंत्रमुग्ध करुन टाकले.

प्रसंग होता विज्ञानदिन सोहळ्याचा. वसईच्या नवमहाराष्ट्र विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्त जागतिक कीर्तीचे अंतराळ संशोधक डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान झाले. प्रमुख उपस्थिती होती वसई - विरार महानगरपालिकेचे महापौर श्री. मोरेश्वर पाटील यांची. त्यावेळी आपल्या आकाशगंगेची व सूर्यमालिकेची माहिती देणारा एक'लेझर शो' सादर करण्यात आला. त्या 'लेझर शो' च्या साहाय्याने जयंतरावांनी अद्‌भुत विश्वाची झलक दाखवली. खूप माहिती सांगितली. ती सर्व माहिती ऐकून श्रोते रोमांचित झाले होते. कार्यक्रमानंतर सर्वजण अनेक वैज्ञानिक संकल्पना डोक्यात घोळवत घरी परतले.

**प्र.५ क) निबंध लेखन :- (कोणतेही एक)** (५)

१) **शेतकऱ्याचे आत्मवृत्त**

माझे नाव आत्माराम राणे. माझे वय ५५ वर्षे आहे. मी जन्मापासून इथेच याच गावात राहत आहे. माझ्या गावाचे नाव साळगांव. मी, पत्नी, दोन मुलगे व एक मुलगी असा माझा परिवार आहे. मी लहानपणापासून शेती करत आहे. आम्ही सहा भावंडे, आई - वडिल, आजी - आजोबा असं मोठं कुटुंब. त्यात घरची परिस्थिती हलाखीची. त्यामुळे माझं शिक्षण चौथीपर्यंत झालं. आई - वडील, आजोबा असल्यामुळे माझ्यावरही शेतीच्या कामाची जबाबदारी लवकरच पडली. माझ्या आईबाबांबरोबर मी शेतात जाऊ लागलो व शेतीची कामे शिकू लागलो. त्यामुळे शिक्षण अर्धवट सोडावं लागलं. नंतर जसजसा मी मोठा होऊ लागलो तसतसे ज्वारी, तांदूळ, मका, गहू अशी धान्ये पिकवायचो. पावसाळा सुरु होताच शेतीची कामे जोरदार सुरु होत. पेरणी - नांगरणी, कापणी, नडणी अशा कामांत दिवस निघून जात असे. इतर शेतकऱ्यांप्रमाणेच मीही दिवसभर आईवडिलांबरोबर शेतात राबत असे.

आम्हा शेतकऱ्यांचा देव म्हणजे पाऊस, योग्य प्रमाणात पाऊस पडला तर शेती अतिशय चांगली होते व पीकही खूप चांगले निघते. पण कधी कधी पाऊस इतका कोसळतो की, उगवलेली सर्व पीके पावसामुळे वाहून जातात. तर कधी कधी पाऊस शेतकऱ्यांवर इतका रुष्ट होतो की, दुष्काळ पडला तर पूर्ण शेती सुकून जाते, हाती काहीही धान्य लागत नाही व पोटापुरतेदेखील मिळत नाही. त्यामुळे आम्हां शेतकऱ्यांचे सारे भवितव्य या पावसावरच अवलंबून असते.

तरी आता पूर्वीपेक्षा निश्चितच पीके चांगली येतात. पूर्वी आतासारखी अवजारे, खते, किडे मारण्याची औषधे, नवे बी - बियाणे उपलब्ध नव्हती. या सर्वांमुळे उत्तम श्रेणीची पिके आम्ही शेतकरी पिकवू शकतो. सरकार आम्हांला शेतीबद्दल वेळोवेळी दूरदर्शन व रेडिओवरुन जास्तीत जास्त माहीती देत असते. त्यामुळेही फायदा होतो.

शास्त्रज्ञांनी लावलेल्या नवनव्या शोधांमुळे शेतीच्या उत्पादनात नक्कीच वाढ झाली आहे व ती शेती करण्यासाठी पूर्वीपेक्षा बरेच कमी कष्ट पडतात. ट्रॅक्टरमुळे नांगरणी करणे सोपे झाले आहे.

परंतु आता शेती करणे पूर्वीइतके जमत नाही आणि कोणाची मदत मिळत नाही. माझे दोन्ही मुलगे १५ वी पर्यंत शिकले आहेत. पण दोघांपैकी एकालाही शेतीत स्वारस्य नाही. दोन्ही मुलगे नोकरी करत आहोत. माझेच मुलगे नाही, तर आजच्या या नव्या पिढीलाच शेतीची तितकीशी आवड नाही. आजची नवी पिढी जास्त करुन पैशामागे धावत आहे आणि कडक उन्हांत, चिखलात शेतात, पावसात राबायला बिलकुल तयार नाही. पण जर शेती केली नाही तर पीक, धान्य कुठून येणार ? खाणार काय ? हे या आजच्या मुलांना कळत नाही. सर्वजण शहराकडे पळतात. उलट नवी पिढी सुशिक्षित असल्याने अधिकाधिक नवे शोध लावून शेतीत जास्तीत जास्त सुधारणा व प्रगती करु शकते.

शेवटी एकढेच म्हणणे आहे की,'आज जरी मी खूप श्रीमंत नसलो तरी अतिशय समाधानी आहे. माझ्या हातांनी केलेल्या श्रमाने, कपाळावरील घामाने, शरीराने केलेल्या मेहनतीने लोकांची भूक शमवत आहे.'

२) **माझा आवडता छंद**

जितक्या व्यक्ती, तितक्या प्रकृती ' असे म्हणतात, त्याप्रमाणे 'जितक्या व्यक्ती, तितके वेगवेगळे छ्ंद'. कुणाला क्रिकेटची मॅच पाहण्याचा छंद असतो, तर कुणाला गाण्याचा; कुणाला पोस्टाची तिकिटे गोळा करण्याचा छंद असतो, तर कुणाला निसर्गसौंद्याचा आस्वाद घेत हिंडण्याचा छ्ंद असतो. कुणी जुनी नाणी गोळा करते, तर कुणी सिनेमाचा 'फर्स्ट डे - फर्स्ट शो ' चुकवत नाही. कुणी पुस्तकी किडे असतात तर कुणी रंगांमध्ये रमतात. माझा छ्ंद मात्र थोडा मुलखावेगळा आहे. लहानपणापासून मला छंद आहे, तो मुंग्यांची रांग पाहण्याचा. तुम्ही म्हणाल हा कसला छंद ! असा कधी छंद असतो का ? आम्ही नाही पाहिला बुवा असला छंद !

आम्ही मुंबईत प्रभादेवीला तळमल्यावर राहायचो, त्यामुळे सकापासून इमारतीच्या आवारात माझे खेळणे, हुंदडणे चालायचे. इमारती समोरुनच मोठा रस्ता जात असल्याने बेफिकीरपणे चालवलेल्या वाहनांची वर्दळ असे, त्यामुळे आवाराबाहेर जायला परवानगी नसे. दुपारच्या वेळी सर्वच मित्रमंडळी आपापल्या घरात खुडबूड करत असत. अशावेळी सोबत खेळायला कोणीच नसे. मग दारात पायरीवर बसून मुंग्यांची रांग पाहणे हे एकच काम उरत असे.

मुंग्यांचे ते शिस्तबध्दपणे एका मागे एक चालणे, सतत कशाच्या ना कशाच्या तरी शोधात हिंडणे, भिंतीवर चढ़ताना कितीही वेळा पडले तरी हार न मानणे, कितीही अडथळे आले तरी ते ओलांडून पुढे जाणे, आपल्या कार्यापासून कधीही न ढळणे, चिकाटीने आपले काम करीत राहणे, अविश्रांत मेहनत करणे, एखादा मोठा दाणा मिळाला तर सहकार्याने तो आपल्या वारुळात नेणे, अशा कितीतरी गोष्टी मी टक लावून बघत असे.

मोठे झाल्यावरही हा छंद सुटला नाही. संध्याकाळी शाळेतून जालो की दिवसभराच्या अभ्‍यासाने मेंदूला थकवा आलेला असे, अशावेळी मुंग्यांच्या त्या रांगा पाहिल्या, त्यांचे ते अविश्रांतपणे कष्ट करणे पाहिले की हा थकवा कुठल्याकुठे दूर पळत असे व आपणही अशी अविश्रांत मेहनत केली पाहिजे, असे नकळतपणे वाटून जात असे. याचाच फायदा असा झाला की आजपर्यंत शाळेतून माझा पहिला नंबर कधी सुटला नाही.

आता मी दहावीला आहे, पण आजही संध्याकाळी शाळेतून आल्यावर न चुकता त्या मुंग्यांच्या रांगा पाहतो. त्यांना पाहताना आईबाबांचे कष्ट आठवतात. मनाला नवी प्रेरणा मिळते. आजूबाजूला कितीही गोंगाट असला, गोंधळ असला तरी आपल्या कामापासून ढळायचे नाही हा मुंग्यांचा संदेश आठवतो व मन अभ्‍यासात एकाग्र होते.

माझ्या छंदाने नकळतपणे माझ्यावर अनेक संस्कार केले आहेत. कितीही संकटे आली तरी ध्येयापासून विचलित व्हायचे नाही. 'Show must go on' प्रमाणे या संकटांवर मात करुन आपले काम चालूच ठेवायचे, हे या छंदानेच मला शिकवले.

माझ्या या छंदाशाठी मला माझा वेगळा वेळ खर्च करावा लागत नाही. तरीही मनाला आगळा आनंद देणारा माझा हा छंद माझ्या आजोबांनी सांगितलेल्या '**असा धरी छंद, जाई तुटोनिया भवबंध**' या अभंगाची आठवण करुन देतो.

३) **मला पंख असते तर !**

रस्त्यावरुन रमत गमत जात होतो. इतक्यात आकाशातून मोठा आवाज करत एक विमान डोक्यावरुन गेले आणि क्षणात मनात विचार आला अरे, आपल्याला सुध्दा आकाशात उडता आले असते ते किती बरे झाले असते.

आकाशात उडण्यासाठी पंख हवेत. खरच! मला पंख असते तर किती मज्जा आली असती. पंख असते ते बाजारात, शाळेत मी उडत उडत गेलो असतो. आकाशात फिरत फिरत मित्रांबरोबर गप्पा मारल्या असत्या. बस, रिक्षा किंवा गाडीची मला वाट बघायला लागली नसती. चटदिशी मला कोठे जाता आले असते. झाडावर बसून निसर्गाचा आस्वाद घेता आला असता. रस्त्यावरच्या वर्दळीतून ट्रॅफीकच्या गर्दीतून सुटका मिळाली असती. रोज संध्याकाळी बीचवर फेरफटका मारता आला असता. असा हवेत उडत असतानाच मी जमिनीवर आलो म्हणजे शुध्दीवर आलो.

आकाशात उडालो असतो तर इतर पक्षी घाबरले असते हा कोणी महाकाय पक्षी ? म्हणून माझ्यावर हल्ला केला असता. माझ्यासारखे सर्वांना पंख आले तर निसर्ग नियम पायदळी तुडवला गेला असता. आकाशातही अपघात घडू लागले असते. एकदा मी माळ्यावर चढलो होतो व पडलो होतो तर पाय मोडला होता. आता पंखामुळे आकाशातून पडलो तर काय होईल ? अशी भीती मनात निर्माण झाली. पंख नकोच! देवाने जे दिले तेच ठीक आहे. माणूस आहे माणूस म्हणूनच जगू दे.